**<u>वादीतर्फे अतिरिक्त सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.</u>**

**६.** आता मला माझ्या वडिलांनी माझ्या हक्कात दि. १८.०४.२०२२ रोजी करुन दिलेले मूळ नोंदणीकृत मृत्यूपत्र दाखविले, त्यावरती माझ्या वडिलांचा फोटो व निशाणी अंगठा असून साक्षीदारांचे फोटो, निशाणी अंगठा आणि स्वाक्ष–या आहेत. त्याला **वस्तू क्र. अ** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादींतर्फे उलट तपास – श्री. जे. जी. दिडबाग वकील.</u>**

**७**. विठ्ठल थळू कांबळे माझा भाऊ आहे. माझ्या वडिलांचे वय झाल्यामुळे त्यांनी माझ्या आईला दावा चालविण्याबाबत वटमुखत्यारपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना लिहिता–वाचता येत नव्हते तसेच चालता येत नसल्यामुळे त्यांनी आईच्या नावे वटमुखत्यारपत्र करुन दिले होते. माझ्या वडिलांना एस.टी. ने प्रवास करणे शक्य नसल्यामुळे ते न्यायालयात येत नव्हते.

८. माझ्या वडिलांचे त्यांच्या वयाच्या ७९ ते ८० व्या वर्षी वयोमानानुसार निधन झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपुर्वी ३ ते ४ वर्ष माझे वडिल अंथरुणाला खिळून होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचे आजारपणात निधन झाले आहे. मी देखील आजारी असल्यास कधीकधी डॉ. दिपक सातोस्कर यांच्याकडे उपचारासाठी जात असते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी त्यांच्या मृत्यूपत्रातील मजकूर सांगितलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना वयोमानामुळे ते सतत आजारी असल्यामुळे मृत्यूपत्रामध्ये काय लिहिले आहे याबाबत माहिती नाही.

**९**. माझा भाऊ शेतीकाम करतो. तो विवाहित असून तो परिवारासह देवर्डे गावात राहतो. माझे वडिल भावासोबत राहत होते. माझ्या वडिलांच्या गरजांची पुर्तता मी व भाऊ दोघे मिळून करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना माझ्या एकटीच्या नावे मृत्यूपत्र करुन देण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना प्रवास करता येत नसल्यामुळे ते आजरा येथे मृत्यूपत्र करण्यासाठी आले नव्हते. मृत्यूपत्रात नमूद केलेल्या जमिनीमधील रस्त्यातून प्रतिवादी आणि लगत जमीनधारकांची वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा हक्क डावलण्यासाठी मी खोटा दावा

दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - १५.१०.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.